# जनसंपर्क अधिकारी


**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ३४४** **दिनांक :- १०/१२/२०२१**

## वेश्या व्यवसायावर छापा कारवाई करुन ०२ अल्पवयीन मुलींची सुटका - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध भाईंदर कक्षाची कामगिरी

दिनांक ०९/१२/२०२१ रोजी व.पो.नि. श्री पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मिरारोड पूर्व येथे राहणारी महिला वेश्यादलाल ही वेश्यागमनाकरीता मुली पुरवित आहे. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. एस.एस.पाटील यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना साईबाबा नगर, मिरारोड पूर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह १५.२० वा. छापा कारवाई केली असता महिला वेश्यादलाल ही राज हिने ०२ अल्पवयीन व ०३ प्रौढ असे एकुण ०५ पिडीत मुलींना वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन, एका १२ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे कौमार्य भंग करण्याच्या बोलीवर रक्कम ठरवुन व स्विकारुन अल्पवयीन मुलींची लैगिंक सतवणूक करताना मिळुन आल्याने सदर बाबत पो.हवा. उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने वेश्यादलाल हीच्या विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ४२९/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३६६(अ), ३७०(१) (४) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ कलम १७,१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई. श्री. महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, स.पो.नि. तेजश्री शिंदे- भरोसा सेल, पो.हवा. उमेश पाटील, विजय निलंगे, म.पो.ना. वैष्णवी यंबर, पो.अं केशव शिंदे, सुप्रिया तिवले, गावडे यांनी केली आहे.

-------ooooo--------